बालमित्रांसाठी

प्रार्थना करार



आमचा उत्पन्नकर्ता, सृष्टीचा देव आमची प्रार्थना ऐकतो, व त्या प्रार्थनेचे उत्तरही देतो. हे किती अद्भुत आहे! येशू म्हणाला, “स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला देण्यात आला आहे.” येशूला जर सर्व अधिकार देण्यात आला तर तुम्ही आणि मी ही कल्पणा करू शकतो की आपण त्याला प्रार्थना केली तर तो आपल्यासाठी काय करू शकतो?”

कृपा

हे स्वर्गीय पित्या, तू माझ्यावर प्रीती केली आहे. आणि मला देखील आपल्या मुलांपैकी एक बनवले आहे त्याबद्दल मी तुझा आभारी आहे.

येशू म्हणाला, “जेव्हा एखादा मुलगा किंवा एखादी मुलगी मला आपला तारणारा म्हणून स्वीकारतात तेव्हा हे घडते – आधी ते हरवलेले असतात आणि मग ते सापडतात त्यामुळे मोठा आनंद उत्साह आणि स्वर्गामध्ये मोठा उत्सव होतो.”

पाठ करण्याचे वचन

आपल्याला देवाची मुले हे नाव मिळाले आहे यात पित्याचे केवढे महान प्रितीदान आहे. - 1 योहान 3:1

देव प्रत्येकावर किती प्रेम करतो हे सर्वांना समजावे अशी येशूची इच्छा होती म्हणून त्याने त्यांना "मेढंपाळ आणि त्याचे हरवलेले मेंढरू" यांची एक गोष्ट सांगितली. या हरवलेल्या मेंढराची त्या मेंढपाळाला खुप काळजी वाटली. म्हणून इतर मेंढरांना सोडून तो ह्या हरवलेल्या मेंढराचा शोध करण्यासाठी गेला. कारण त्याची इच्छा होती की, ते हरवलेले मेंढरू सुरक्षित असावे. मेंढरे स्वतःला मदत करू शकत नाहीत. आणि कधी – कधी ते आपला मार्ग भटकतात, आणि हरवतात तेव्हा त्यांना अस्वल किंवा सिंह त्यांच्यावर हल्ला करून त्यांना खाऊ शकतात.

मेंढरांना सर्व धोक्यांपासून सुरक्षित ठेवणे ही मेंढपाळाची जबाबदारी आहे. आणि त्या मेंढपाळाने तेच केले. मेंढपाळाला जेव्हा त्याचे हरवलेले मेंढरू सापडले तेव्हा तो खूप आनंदित झाला. त्याने ते हरवलेले मेंढरू सापडल्या नंतर आपल्या खांद्यावर घेतले आणि त्याला घरापर्यंत घेवून आला .

येशू तुमच्या सोबत आनंदाने उत्सव साजरा करतो, त्याच्या प्रीतीने तो तुम्हांला शांत करतो. जेव्हा तुम्ही गीत गाता तेव्हा त्याला अतिशय होतो.

प्रीती

तुझ्या आज्ञा पाळण्यास आणि तुझ्यावर प्रेम करण्यास मला मदत कर.



खुप खुप वर्षांपुर्वी,
अब्राहाम या जगात राहत होता. अब्राहाम
देवावर प्रीती करत असे. तो म्हातारा झाला तेव्हा
देव त्याला म्हणाला,“अब्राहामा! तुझा देश, तुझे कुटूंब
व तुझे नातेवाईक यांना सोड आणि जो दुरचा
देश मी तुला दाखविल तेथे जा. कारण मी तुला
आशीर्वाद देईल.”

देवाची इच्छा आहे कि आपण त्याच्या आज्ञांचे पालन करावे. आपण देवाच्या आज्ञांचे पालन केल्याने आपण त्याच्यावर प्रीती करतो हे आपण दर्शवितो.

पाठ करण्याचे वचन

आपला देव परमेश्वर याच्यावर पुर्ण अंतःकरणाने, पुर्ण जिवाने व पुर्ण मनाने प्रीती कर, कारण ही सर्वात मोठी आज्ञा आहे.

मत्तय 22:37, 38

अब्राहामाने देवाच्या आज्ञेचे पालन केले, त्याची पत्नी आणि जे काही त्याचे होते, ते सर्व घेवून तो दूर असलेल्या नवीन देशाकडे जाण्यासाठी निघाला. अब्राहामाचे हे आज्ञापालन त्याच्या जीवनभराच्या साहसी प्रवासाची सुरूवात होती. तो आज्ञांचे पालन करण्यात, प्रीती करण्यात व विश्वास ठेवण्यात वाढत गेला.

येशूच्या आज्ञांचे पालन करणे आणि त्याच्या मागे चालणे हा एक रोमांचक प्रवास आहे.

दया

जशी तू माझ्यावर प्रीती केली
तशी इतरांवर प्रीती करण्यास
मला सहाय्य कर

पाठ करण्याचे वचन

जशी मी तुमच्या वर प्रीती केली तशी तुम्ही एकमेकांवर प्रीती करा, ही माझी आज्ञा आहे.
योहान 15:12

एकदा एक माणूस रस्त्याने प्रवास करत होता आणि दुष्ट माणसांच्या टोळीने त्याच्यावर हल्ला करून त्याला मारहाण केली. त्यांनी त्याच्या सर्व वस्तू लूटल्या आणि त्याला रस्त्यावर मरण्यासाठी सोडून दिले. त्यानंतर काही लोक त्या रस्त्याने आले. त्यांना त्याची दया आली नाही . मग एक शोमरोनी (एक गैर-यहूदी मनुष्य) त्याच बाजूने जात होता. त्याने त्याला उचलले आणि त्याच्या जखमांना स्वच्छ केले व त्याला बरे होण्यासाठी एका उतारशाळेत नेले आणि त्याच्यासाठी पैसे देखिल भरले.



येशूने हे बोलून गोष्ट संपवली, "तुम्ही सुद्धा जे दुःखी आहे त्यांच्याकडे जावून त्याच्यावर अशीच दया करावी."

हे देवा, केवळ शब्दांनी नव्हे तर मी कृत्यांसह तुझ्यावर प्रेम करू इच्छितो.

गोष्ट

माझ्या पापांची मला क्षमा कर, मला धुवून शूध्द कर.

पाठ करण्याचे वचन

माझ्या अधर्म तु पुर्णपणे धुऊन काढ आणि माझ्या पापांपासून मला शुध्द कर. - स्तोत्रसंहिता 51:2

एकदा एका राजाने त्याच्या सेवकांना बोलवले, आणि त्याच्यांवर त्याचे किती कर्ज आहे हे त्याने त्यांच्यापैकी प्रत्येकाला त्याने विचारले, *“माझे कर्ज परत करा”* त्यातल्या एका सेवकावर खुप कर्ज होते, तो राजाला म्हणाला,*“मी तुझ्या कर्जाची परत फेड करू शकत नाही.”* राजा म्हणाला, *“मी तुला व तुझ्या संपूर्ण कुंटुंबाला गुलाम म्हणुन विकून टाकेण जेणे करून माझे पुर्ण पैसे वसूल होतील.”*

राजाचे हे शब्द ऐकताच तो मनुष्य रडू लागला व गयावया करू लागला. राजाला त्याची दया आली आणि राजा म्हणाला,*“ठीक आहे. मी तुझे सर्व कर्ज माफ करतो”* आता हा सेवक कर्जमुक्त झाला.

हा सेवक कर्जमुक्त झाल्यावर बाहेर गेला, आणि त्याला त्याच्या सोबतीचा एक दुसरा सेवक भेटला, त्याच्यावर या पहील्या सेवकाचे कर्ज होते आणि त्याच्या कडे थोडेसेच पैसे होते. या सेवकाने त्याला धमकी दिली, *“जर तु माझे पैसे देणार नाहीस तर मी तुला जेल मध्ये टाकेल.”* परंतु या सेवकाला त्याची दया आली नाही आणि त्याने त्याला जेल मध्ये टाकुन दिले.

जेव्हा राजाला ही घटना कळाली तेव्हा राजाला खुप राग आला, आणि तो मोठ्याने ओरडून म्हणाला,“अरे दुष्टा! मी तुझे ऐवढे पैसे माफ केले, तर तु देखिल तुझ्या सेवकावर दया करायची नव्हती काय?” आणि असे म्हणून राजाने त्याला तुरूंगात टाकले.

येशू मला क्षमा करतो म्हणून मी देखिल इतरांना क्षमा करू इच्छितो.

उपासना

मी पूर्ण मनाने तुझे गौरव करील

पाठ करणाचे वचन

हे देवा मी माझ्या पूर्ण अंत:करणाने तुझी स्तूति करीन, मी तुझी अद्भुत कृत्ये सर्वांना सांगीन. - स्तोत्रसंहीता 9:1

येशूचा जन्म झाला तेव्हा सगळे आनंदीत झाले, स्वर्गदूत खाली उतरून आले व म्हणाले, *“स्वर्गात देवाला गौरव, पृथ्वी वर सर्वांना शांती.”* मेंढपाळही बाळ येशूला भेटण्यास आणि उपासना करण्यास आले.

मी दररोज तुझी स्तूति करू इच्छितो.

निर्णय

येशू तू माझा प्रभु आहे, म्हणून
मी तुझ्या मागे चालु इच्छितो.

पाठ करण्याचे वचन

तुम्ही मला गुरू व प्रभू म्हणुन ओळखतात तुम्ही ते योग्यच करता, मी तोच आहे. योहान 13:13

अचानक, पेत्राला येशूचे ते शब्द आठवले आणि तो तेथून रडत रडत पळून गेला. त्याला फार वाईट वाटले. परंतु येशूने पेत्रा विषयची आशा सोडली नाही. येशूने आपल्या पुनरुत्थाना नंतर, पेत्रा संगती न्याहारी केली आणि त्याने त्याला क्षमा केली . येशूची इच्छा होती की पेत्राने येशूचे शिष्य असावे आणि येशूचे अनेक शिष्य ही बनवावे. जरी पेत्र परिपुर्ण नव्हता तरीही येशूला हे ठाऊक होते की पेत्राला खरोखर त्याचा प्रभु येशू, याच्या मागे चालण्याची मनापासून इच्छा आहे.

येशू मी नेहमी तुझ्यासोबती निष्ठावान राहू इच्छीतो.

अवलंबून असणे

मला तुझ्या पवित्र आत्म्याने भर

पाठ करण्याचे वचन

आत्म्याने पूर्ण व्हा. - इफिसकांस पत्र 5:18

मंडळीला त्याचे कार्य पुर्ण करण्यासाठी मदत व्हावी म्हणून येशूने त्याचा आत्मा पाठवला. “पेन्टेकॉस्ट” म्हटलेल्या एका विशिष्ट दिवशी, फार मोठ्या वादळाचा आवाज झाला आणि त्या दिवशी त्याने प्रार्थना करणाऱ्या प्रत्येकाला पवित्र आत्म्याने भरले.

येशू तुझ्या पवित्र आत्म्याने अधिक अधिक भरूण मला तुझ्यासारखे बनव.

प्रभाव

मला तुझ्या कृपा, सत्य व न्यायाचे साधन बनव.

शिष्यांनी येशूला विचारले, “स्वर्गाच्या राजात सर्वात महान कोण?” येशू त्यांचे विचार ओळखुन होता. त्याने एका लहान मुलाला बोलवीले. येशूने आपल्या शिष्यांच्या डोळ्यात पाहुन, त्यांना एक फार अदभुत गोष्ट सांगितली, “जो कोणी स्वतःला ह्या बाळासारखा नम्र करतो तो स्वर्गाच्या राज्यात सर्वश्रेष्ट आहे.”

पाठ करण्याचे वचन

आम्ही त्याचे तेज पाहिले आहे, एकूलता एक पुत्र, जो पित्याकडून आला, त्याच्यासारखा कृपा व सत्कर्मांनी परीपूर्ण असा तो होता. - योहान 1:14

येशूचे अतःकरण न्याय प्रिय होते. तो म्हणाला,“*जर कोणी ह्या लेकरांना दुःख देईल, तर तो भयंकर वाईट कार्य करणारा ठरेल.*” ज्याच्याकडे अनेक लोक दूर्लक्ष करत असत, त्यांना तो मदत करत असे. लहान, आजारी आणि दरिद्री अशा लोकांची तो मदत करत असे.

मी देखील नेहमी सत्य सांगण्याचा प्रयत्न करणार आहे.

शिष्यत्त्व

मला तुझ्या गौरवासाठी उपयोगात आण आणि इतरांनाही तुझ्या मागे चालावे असे आमंत्रण देण्यासाठी माझा उपयोग कर.

पाठ करण्याचे वचन

म्हणून जा आणि संपुर्ण राष्ट्रतील लोकांना माझे शिष्य बनवा. त्यांना पित्याच्या, पुत्राचा आणि पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या. - मतय 28:19

एकदा शौल (त्याचे नाव पौल होण्याअगोदर शौल असे होते) रस्त्याने जात होता. अचानक एक फार मोठा तेजस्वी प्रकाश स्वर्गातून त्याच्याकडे आलेला त्याने पाहिला, आणि तो जमिनीवर पडला त्या प्रकाशाने त्याला आंधळे केले. मग शौलाला एक वाणी ऐकू आली, "*शौला, शौला तू माझा छळ का करतोस?*" शौल ओरडुन म्हणाला, "*तु कोण आहेस प्रभु?*" "*ज्याचा तू छळ करतोस, तोच मी येशू आहे.*" पौल घाबरला आणि थर – थर कापू लागला. त्याला तीन दिवसापर्यंत काही दिसले नाही.

देवाने शौलाला बरे केले आणि तो सगळीकडे फिरून येशूविषयी उपदेश करू लागला. शौलाचे नाव नंतर बदलून पौल ठेवण्यात आले. त्याने येशूसाठी सर्व जगाची उलथा पालथ केली, देवाला गौरव दिले आणि इतरांनी ही ते करण्यास शिकवले.

येशूच्यामागे चालण्यासाठी मी कोणाला आमंत्रन देऊ शकतो.

अधिकार

येशूच्या नावात मी प्रार्थना करतो आमेन.

पाठ करण्याचे वचन

म्हणून, देवाने त्याला सर्वांपेक्षा आणि प्रत्येक नावाहून श्रेष्ठ असे नाव त्याला दिले आहे.

फिलिप्पै 2:9

“येशू, स्वामी! माझ्यावर दया करा,” बार्तीमय ओरडला.

बार्तीमयाच्या आजुबाजूस उभे असलेले लोक त्याच्यावर चिडले, *“ये गप्प बस!”* ते त्याच्यावर ओरडले. परंतु बार्तीमय मोठ-मोठ्याने ओरडतच राहिला. येशूने त्याची वाणी एकली आणि म्हणाला,*“त्याला माझ्याकडे आणा”* बर्तीमयाने त्याचा अंगरखा तेथेच टाकून दिला आणि तो येशूकडे धावत गेला. येशूने त्याला म्हटले,*“तुला काय पाहिजे?”* ,बार्तीमयाने उत्तर दिले *“मी पाहाता यावे अशी माझी इच्छा आहे. मला दृष्टी दे.”*

जेव्हा बार्तीमयाने येशूला आरोळी मारली, तेव्हा येशूने त्याचे ऐकले आणि तसेच येशू तुमची देखील प्रार्थना ऐकेल.

कृती पायरी

1. प्रार्थनेच्या कराराचे अवलोकन करा.
2. ह्या प्रार्थना करारातील प्रार्थना 40 दिवसापर्यंत दररोज करा.
3. प्रार्थने विषयी पवित्रशास्त्रातील वचने पाठ करा.

4. खरे किंवा खोटे ह्यावर वर्तुळ काढा आणि त्याच्या उत्तरांची चर्चा करा

देवाचे कृपेने मला त्याचे आवडते मूल बनविले आहे.	खरे किंवा खोटे
आज्ञा पालना मुळे आर्शिवाद वाहु लागतात.	खरे किंवा खोटे
जे आपल्यावर प्रेम करतात आपण फक्त त्यांच्यावरच प्रिती केली पाहिजे	खरे किंवा खोटे
येशूची इच्छा आहे की आपण इतरांना क्षमा करावी आणि कुणा विषयी आपल्या मना मध्ये राग ठेवू नाही	खरे किंवा खोटे
आपण जेव्हा आनंदीत आहोत तेव्हाच आपण देवाची स्तुती केली पाहिजे	खरे किंवा खोटे
जेव्हा आपण देवाच्या मागे चालन्याचा निर्णन घेतो तेव्हा तो आपल्याला अधिका – अधिक त्याच्या सारखे करतो	खरे किंवा खोटे
पवित्र आत्मा हा मार्गदर्शक आहे.	खरे किंवा खोटे
येशूला लेकरांसोबत घालवन्या साठी वेळ नव्हता.	खरे किंवा खोटे
देव केवळ मोठ्यांचा उपयोग येशू विषयी इतरांना सांगण्यासाठी करून घेतो.	खरे किंवा खोटे
स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार देवा कडे आहे	खरे किंवा खोटे
प्रार्थनेमध्ये सामर्थ्य आहे कारण की येशूच्या नावामध्ये सामर्थ्य आहे	खरे किंवा खोटे
जेव्हा मी प्रार्थना करतो तेव्हा देव माझे एकतो	खरे किंवा खोटे

माझे नाव ______________________

मी आज पासून लेकरांसाठी ही प्रार्थना करायला सुरूवात केली आहे.

आजचा दिनांक : ______________

माझे प्रार्थना करारातील सहभागी

नाव ______________ तारीख ________

नाव ______________ तारीख ________

नाव ______________ तारीख ________

नाव ______________ तारीख ________

नाव ______________ तारीख ________

प्रार्थना कराराची प्रार्थना

बालमित्रांसाठी

पहिले पाऊल तुम्ही स्व:त ही प्रार्थना स्वत:साठी कमीतकमी दररोज दहा दिवस करा

दुसरे पाऊल तुम्ही ही प्रार्थना करता तेव्हा येशूला "मी आणखी कोणत्या व्यक्तीला ह्या प्रार्थना करारात आणायचे?" तो व्यक्ती त्याने तुम्हांला दाखवावा अशी विनंती करा.

तिसरे पाऊल जो व्यक्ती देवाने तुम्हांला दाखवला आहे त्या व्यक्तीला ही प्रर्थना ४० दिवस करण्यासाठी आमंत्रण द्या. आणि तुम्ही दोघे मिळुन ही प्रार्थना करा. कदाचीत ही व्यक्ती तुमचा मित्र, आई, वडील, भाऊ, बहीण, तुमचे आजी – आजोबा, शिक्षक किंवा तुमचे पाळक असु शकतात.

चौथे पाऊल तुमच्या सोबतीच्या प्रार्थना करणाऱ्यांना, देव तुमच्या प्रार्थनेचे कसे विविध प्रकारे उत्तर देत आहे ते सांगा. तुम्ही ते लिहु शकता किंवा त्याचे चित्र देखिल काढु शकता.

पाचवे पाऊल पवित्र शास्त्रा मधील जी वचन दिली आहेत ती पाठंतर करा.

सहावे पाऊल येशू ख्रिस्ताचे शुभवर्तन इतरांना सांगावा.

सातवे पाऊल वरील सर्व प्रार्थना सहभागी संगती पुन्हा एकदा कराव्या जेणेकरूण तुम्ही येशू सोबत चालु शकता.

अभिनंदन

तुम्हा सर्वांना अभिनंदन! तुम्ही बालमित्रांच्या प्रार्थना कराराच्या अभ्यासक्रमाला पूर्ण केले आहे आणि देवाच्या प्रीती व कृपेचा द्वारे परिवर्तन घडवणाऱ्या स्वभावाविषयी तुम्ही सर्व शिकले आहात.

आपण शिकलेल्या गोष्टी मधील मेंढराप्रमाणे आम्ही सर्वजण आपापल्या पापांमध्ये हरवलेले आणि देवापासून भटकलेले असे होतो. आम्ही देवापासून दुरावलेले आहोत. परंतु आमच्या पापांपासून आम्हाला सोडवण्यासाठी आपला उत्तम मेंढपाळ येशू आम्हासाठी आला आहे. आमच्या पापाचे प्रायश्चित्त करण्यासाठी त्याने वधस्तंभावर आपला प्राण दिला आणि तिसऱ्या दिवशी तो पुन्हा जिवंत झाला. आम्ही आपल्या अंतकरणात मध्ये त्याला आपला वैयक्तिक प्रभू व तारणारा म्हणून स्वीकारले तर तो आमच्या पापांची क्षमा करतो आणि आमचे तारण करतो. आपण हरवलेल्या मेंढराच्या गोष्टींमध्ये पाहिले तसेच आजही तो आमचा शोध घेत आहे कारण तो उत्तम मेंढपाळ आहे.

तुम्ही विश्वास ठेवून ही साधी प्रार्थना केली तर तुम्ही येशूसोबत सदासर्वकाळ राहाल व तो तुमच्या पापांची क्षमा करेल.

स्वर्गिय पित्या,

मला माझ्या पापांची क्षमा करा मला शुद्ध करा
मी तुम्हाला अन माझ्या अंत:करणामध्ये माझा वैयक्तिक तारणारा व प्रभू म्हणून स्वीकारत आहे
माझ्यावर प्रिती केल्याबद्दल व मला आपल्या मुलांपैकी एक केल्याबद्दल मी तुमचे आभार मानतो

येशूच्या नावाने प्रार्थना केली म्हणून तू रोक. अमिन

हरवलेले मेंढरू सापडल्यानंतर जसा मेंढपाळाने अतिशय मोठा आनंद व उत्सव साजरा केला. अगदी तसाच उत्सव देखील आमच्यासाठी येशू साजरा करतो. तो आम्हाला असे म्हणतो की, " तुमचा प्रभूदेव तुमच्यासोबत आहे कारण करण्यासाठी तो समर्थ असा देव आहे तो तुमच्यावर अत्यंत प्रसन्न आहे आणि तो तुमच्यावर आनंद करणार आहे" सफन्या ३:१७

देवा ची बातमी तुम्ही आता इतरांना सांगण्यास सुरुवात करू शकता. येशूच्या मागे चालणे म्हणजे काय हे तुम्ही यावरून शिकवू शकणार

बालमित्रांसाठी

प्रार्थनेचा करार

कृपा — हे स्वर्गीय पित्या, तू माझ्यावर प्रीती केली आहे. आणि मला देखील आपल्या मुलांपैकी एक बनवले आहे त्याबद्दल मी तुझा आभारी आहे

प्रीती — तुझ्या आज्ञा पाळण्यास आणि तुझ्यावर प्रेम करण्यास मला मदत कर.

दया — जशी तू माझ्यावर प्रीती केली
तशी इतरांवर प्रीती करण्यास
मला सहाय्य कर

पश्चात्ताप — माझ्या पापांसाठीमला क्षमा कर. मला स्वच्छ धुवा.

उपासना — मी पूर्ण मनाने तुझे गौरव करील

निर्णय — मी पूर्ण मनाने तुझे गौरव करील

अवलंबुन असणे — मला तुझ्या पवित्र आत्म्याने भर

प्रभाव — मला तुझ्या कृपा, सत्य व न्यायाचे साधन बनव.

शिष्यत्त्व — मला तुझ्या गौरवासाठी उपयोगात आण आणि इतरांनाही तुझ्या मागे चालावे असे आमंत्रण देण्यासाठी माझा उपयोग कर.

अधिकार — येशूच्या नावात मी प्रार्थना करतो आमेन.

40 DAY PRAYER COVENANT For Kids!

Copyright © 2016 by Candy Marballi. All rights reserved.
Illustrations by Luke Flowers. The Prayer Covenant for Kids adapted from The Power of the Prayer Covenant for Kids, by Candy Marballi with Stephen Eyre

www.theprayercovenant.org

Marathi